**ठळक बातम्या**

- यंदाच्या खरीप हंगामात देशात ११ कोटी २१ लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर पेरणी
- महाराष्ट्रातल्या २४७ नगरपालिका आणि १४७ नगरपंचायतींमधल्या नगराध्यक्षपदाचं आरक्षण जाहीर
- बिहारमध्ये विधानसभेसाठी ६ आणि ११ नोव्हेंबरला मतदान, १४ नोव्हेंबरला मतमोजणी
- अवघ्या ४ आठवड्यात सॅबास्टियन लेकार्न यांच्याकडून फ्रान्सच्या प्रधानमंत्रीपदाचा राजीनामा

**आणि**

- मेरी ब्रंकोव्ह, फ्रेड रॅम्सडेल आणि शिमोन साकागुची यांना वैद्यकीय क्षेत्रातला नोबेल पुरस्कार जाहीर

<><><><>

यंदाच्या खरीप हंगामात ११ कोटी २१ लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर पेरणी झाली आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून.

**- - होल्ड व्हाइस कास्ट - -**

*(भाताचं पेरणी क्षेत्र सरासरी ४ कोटी ३ लाख हेक्टरहून अधिक होतं ते यंदा ४ कोटी ४१ लाख हेक्टरपेक्षा जास्त झालं आहे. कापसाचं पेरणी क्षेत्र सरासरी १ कोटी २९ लाख हेक्टर होतं ते यंदा १ कोटी १० लाख हेक्टरपर्यंत खाली आलं आहे. मक्याच्या पेरणी क्षेत्रात यंदा १२ टक्क्यापेक्षा जास्त वाढ झाल्यानं भरडधान्याच्या उत्पादनात लक्षणीय वाढ अपेक्षित आहे. गेल्या चार वर्षात सरासरी ७८ लाख ९५ हजार हेक्टर क्षेत्रावर मका पेरला गेला. यावर्षी हे क्षेत्र ९४ लाख ९५ हजार हेक्टरवर गेलं आहे. डाळी आणि गळिताचं क्षेत्र मात्र घटलं आहे. डाळींचं पेरणी क्षेत्र गेल्या ४ वर्षात सरासरी १ कोटी २९ लाख हेक्टर होतं ते यंदा १ कोटी २० लाख हेक्टरपर्यंत खाली आलं आहे. गळीत पिकांचं क्षेत्र यंदा १ कोटी ९० लाख १३ हजार हेक्टर इतकं आहे. ऊसाचं पेरणी क्षेत्र सरासरी ५२ लाख ५१ हजार हेक्टर होतं ते यंदा ५९ लाख हेक्टरच्या पुढे गेलं आहे.)*

<><><><>

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी आज २४७ नगरपालिका आणि १४७ नगरपंचायतींच्या नगराध्यक्षपदाच्या आरक्षणाची सोडत मुंबईत झाली.

२४७ नगर परिषदांमधल्या ३३ अनुसूचित जातींसाठी, ११ अनुसूचित जमातींसाठी, ६७ ओबीसींसाठी आरक्षित असून उर्वरित १३६ नगर परिषदांमधलं नगराध्यक्ष पद खुल्या गटातल्या उमेदवारांना मिळतील.

१४७ नगर पंचायतींपैकी १८ अनुसूचित जातींसाठी, १३ अनुसूचित जमातींसाठी, ४० ओबीसींसाठी आरक्षित आहेत. नगर पंचायतींमधल्या उर्वरित ७६ जागांवर खुल्या प्रवर्गातून नगराध्यक्ष निवडून येतील.

सर्व गटातल्या निम्म्या जागा महिलांसाठी राखीव आहेत.

<><><><>

MPSC अर्थात महाराष्ट्र लोकसेवा आयोगानं गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षेची जाहिरात आज प्रसिद्ध केला. या अंतर्गत ९३८ पदांसाठी ४ जानेवारी २०२६ रोजी परीक्षा होईल. यासाठी ७ ऑक्टोबर ते २७ ऑक्टोबर दरम्यान अर्ज करता येईल.

यात उद्योग निरीक्षक संवर्गातली ९ पदं, तांत्रिक सहायक संवर्गासाठी ४ पदं, कर सहायक संवर्गासाठी ७३ पदं, तसंच लिपिक-टंकलेखक संवर्गासाठी ८५२ पदांचा समावेश आहे. विविध श्रेणीत १८ ते ४३ वयोगटातले उमेदवार यासाठी अर्ज करू शकतात. दिव्यांग, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त यांच्यासाठी वयोमर्यादेची अट आणखी शिथिल आहे.

<><><><>

बिहार विधानसभा निवडणुकीसाठी ६ आणि ११ नोव्हेंबरला मतदान होणार आहे. तर १४ नोव्हेंबरला मतमोजणी होईल, अशी घोषणा मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत केली. एकूण २४३ पैकी पहिल्या टप्प्यात १२१ तर दुसऱ्या टप्प्यात १२२ मतदारसंघात मतदान होणार आहे.

- **- होल्ड - ज्ञानेश कुमार - -**

जम्मू काश्मीर, राजस्थान, झारखंड, तेलंगणा, पंजाब, मिझोरम आणि ओडिशामधल्या विधानसभेच्या ८ जागांसाठी पोटनिवडणूकही त्यांनी आज जाहीर केली.

<><><><>

सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर पादत्राणं फेकण्याचा प्रयत्न करणाऱ्या राकेश किशोर या वकीलाला सुरक्षा रक्षकांनी ताब्यात घेतलं आहे. सकाळी साडे अकरा वाजता सर्वोच्च न्यायालयात सुनावणी दरम्यान त्यानं पादत्राणं काढून भिरकवण्याचा प्रयत्न केला. सुरक्षा रक्षकांनी त्याला लगेच ताब्यात घेतलं. याप्रकरणी बार कौन्सिलनं राकेश किशोरचं सदस्यत्व निलंबित केलं आहे. या हल्ल्याच्या प्रयत्नाचा देशभरातल्या विविध नेत्यांनी निषेध केला आहे.

**<><><><>**

लडाखमधले वैज्ञानिक आणि पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या अटकेबद्दल सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार आणि लडाख प्रशासनाकडून एका आठवड्यात जबाब मागितला आहे. वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली अंगमो यांनी दाखल केलेल्या याचिकेवर न्यायमूर्ती अरविंद कुमार आणि न्यायमूर्ती एन व्ही अंजारिया यांनी हा आदेश दिला. लडाखमधे हिंसक आंदोलनं झाल्यानंतर सोनम वांगचुक यांना १४ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय सुरक्षा कायद्याखाली अटक झाली आहे. पुढची सुनावणी येत्या १४ ऑक्टोबरला होईल.

**<><><><>**

पश्चिम बंगालमधे अतिवृष्टी आणि पुराने बाधित परिसरात मदत कार्यासाठी गेलेल्या भाजपा नेत्यांवर हल्ला झाल्याचं वृत्त आहे. उत्तर मालदाचे आमदार शंकर घोष आणि खासदार खगेन मुर्मू जलपायगुडी जिल्ह्यात नागराकटा इथं गेले असताना त्यांच्या गाडीवर दगडफेक झाली. त्यात ते दोघे जखमी झाले. त्यांना खासगी रुग्णालयात दाखल केलं असून भाजपाने याबद्दल तृणमूल काँग्रेसला दोष दिला आहे.

**<><><><>**

कतारच्या दौऱ्यावर असलेले केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांची आज कतारचे वाणिज्य आणि उद्योग मंत्री शेख फैसल बिन थानी बिन फैसल अल थानी यांच्यासोबत द्विपक्षीय बैठक झाली. भारत-कतार द्विपक्षीय व्यापार वाढवण्याबाबत यावेळी चर्चा झाली. उभय देशांमधली बहुआयामी भागीदारी आणखी मजबूत करण्याच्या वचनबद्धतेची पुष्टी दोन्ही नेत्यांनी केली. या दौऱ्यात गोयल यांनी कतारमध्ये UPI सुविधेचा प्रारंभ केला.

<><><>

फ्रान्सचे प्रधानमंत्री सॅबास्टियन लेकार्न यांनी पदाचा राजीनामा दिला असून फ्रान्समधे राजकीय अस्थिरता वाढली आहे. लेकार्न यांनी पदभार स्वीकारल्यावर ४ आठवड्यांच्या आतच राजीनामा दिल्यानं ते फ्रान्सचे आजवर सर्वात कमी काळ पदावर राहीलेले प्रधानमंत्री बनले आहेत. २०२४मधे झालेल्या निवडणुकीत कोणत्याच पक्षाला बहुमत न मिळाल्यानं तिथं अस्थिरता वाढली आहे.

<><><>

युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष अर्सुला फॉन दॅ लीन यांना या आठवड्यात दोन वेळा अविश्वास ठरावाला सामोरं जावं लागलं. पेट्रियट्स फॉर युरोप आणि डावे पक्ष अर्सुला यांच्यावर स्वतंत्रपणे अविश्वास प्रस्ताव आणणार आहेत. युरोपियन युनियन आणि अमेरिका व्यापार करार तसंच युरोपियन युनियन मर्कोसर करार हाताळणी व्यवस्थित न केल्याचा तसंच युरोपच्या हितसंबंधांशी तडजोड केल्याचा त्यांच्यावर सर्व राजकीय पक्षांकडून आरोप होत आहे. अविश्वास प्रस्तावावर आज संसदेत चर्चा होत असून गुरुवारी मतदान होणार आहे.

<><><>

मेरी ब्रंकोव्ह, फ्रेड रॅम्सडेल आणि शिमोन साकागुची यांना शरीरक्रियाशास्त्रतल्या क्रांतिकारी संशोधनासाठी २०२५ या वर्षाचा वैद्यकीय क्षेत्रातला नोबेल पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. या संशोधनामुळे ऑटो इम्यून आजारांवर उपचार करता येणार आहेत आणि ते पूर्ण बरेही करता येणार आहेत. यासोबतच कर्करोग आणि स्टेम सेल प्रत्यारोपणानंतरची गुंतागुंत टाळता येणार आहे.

<><><>

इंडोनेशियामध्ये एका निवासी शाळेची इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेतल्या बळींची संख्या ५३ वर पोहोचली आहे. ढिगाऱ्याखाली दबलेल्या विद्यार्थ्यांना बाहेर काढण्याचं काम अद्याप सुरु आहे. २९ सप्टेंबरला ही शाळा कोसळली तेव्हा शेकडो विद्यार्थी आतमध्ये प्रार्थना करीत होते.

<><><>

रशिया आणि युक्रेनमधे सुरू असलेल्या संघर्षामुळे दोन्ही देशांमधल्या अनेक भागात वीजपुरवठा खंडित झाला. युक्रेनने केलेल्या हल्ल्यामुळे रशियातील बेल्गरोद प्रदेशात वीजपुरवठा खंडित झाला, याचा फटका जवळपास ४० हजार नागरिकांना बसला आहे.

<><><><>

जागतिक पॅरा ऍथलिटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत भारताने सहा सुवर्ण पदकासह २२ पदकं जिंकली आहेत. या स्पर्धेत शंभर देशातल्या खेळाडूंनी सहभाग घेतला होता. भारतीय खेळाडूंनी सर्वोत्तम कामगिरी केल्याचं सांगत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी खेळाडूंचं कौतुक केलं. भारतीय खेळाडूंची कामगिरी देशातल्या असंख्य लोकांना प्रेरणादायी ठरेल, असं म्हणत प्रधानमंत्र्यांनी खेळाडूंना त्यांच्या भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या.

//<><><><>//